# येशूने एका मुलाच्या दानाचा उपयोग करुन 5000 लोकांना भोजन दिले

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, मुलांनी प्रेमाने एकमेकांची काळजी घ्यावी यासाठी उत्तम मेंढपाळ काय करतो ते त्यांना दाखवण्याकरीता कृपा करुन ह्या अभ्यासाचा उपयोग करुन घे.''

मुलांचे वयोगट आणि गरजा यानुसार कार्यक्रम निवडा. एका मुलाने आपल्या जवळील पाच भाकरी व दोन मासे येशूला दिले आणि त्याने अद्‌भुतरित्या लोकांना त्यातून कसे जेवायला दिले हे स्पष्ट करुन सांगा (योहान 6:9).

आमचा उत्तम मेंढपाळ असणाया येशूने पाच भाकरी व दोन मासे एवढया जेवणातून 5,000 भुकेल्या लोकांना कसे जेवण दिले ते **मोठया मुलाने किंवा शिक्षकांनी मार्क 6:30-44** मधून वाचून दाखवावे किंवा सांगावे.

**पुढील प्रश्न विचारा** (मार्क 6 मधील वचनांमधून उत्तरे पाहा).

- भुकेल्या लोकांबद्दल येशूला काय वाटले? *(34).*
- येशूने भुकेल्या लोकांसाठी काय करण्यास आपल्या शिष्यांना सांगितले? *(37).*
- शिष्यांनी लोकांना कशा प्रकारे व्यवस्थित बसवले? *(40)*
- येशूने लोकांना जेवण देण्यासाठी कशाचा उपयोग केला? *(41)*
- लोकांचे जेवण झाल्यावर किती जेवण शिल्लक राहिले? *(पाहा व. 43).*



मार्क 6:30-44 मधून येशूने 5,000 लोकांना जेवण दिले ह्या कथावृत्तांताचे **नाट्यकीकरण करा.**

मुलांना नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढायांशी बोलून व्यवस्था करा. मुलांकडून तयारी करुन घ्या. मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

- **मोठया मुलांनी किंवा** प्रौढांनी **येशू** व **निवेदक** ह्या भूमिका कराव्यात. निवेदक कथावृत्तांत्ताचा सारांश तयार करुन मुलांकडून संवाद पाठ करुन घेतील.
- **लहान मुलांनी भुकेले लोक** आणि **शिष्य** ह्या भूमिका कराव्यात. शिष्यांकडे अन्न दाखवणाया गोष्टी असाव्यात.

**निवेदक :** मार्क 6:30-44 मधून कथावृत्तांत्त सांगून म्हणा, ''लोक काय बोलत आहेत ते ऐका.''

**लोक :** ''चला आपण येशूच्या मागे जाऊया.''

''मला त्याचे शिकवणे फार आवडते.''

''तो आमचा उत्तम मेंढपाळ आहे.''

**शिष्य :** ''येशू, लोकांना त्यांच्या त्यांच्या घरी पाठवून द्या.''

''त्यांना भूक लागलेली आहे आणि येथे तर काहीच मिळत नाही.''

**येशू :** ''मग तुम्ही त्यांना जेवायला द्या.''

**शिष्य :** ''आम्ही त्यांना कसे जेवायला देणार?''

''आमच्याकडे पुरेसे पैसेही नाहीत.''

''आमच्याकडे पैसे असते तरी येथे जेवण कोठे विकत घेणार.''

**येशू :** ''हा मुलगा त्याचे जेवण मला देत आहे! लोकांना गटागटाने बसायला सांगा.''

**लोक :** लहान लहान गट करुन बसा.

**येशू :** वर पाहून म्हणा, ''हे प्रेमळ पित्या, ह्या भेजनाबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो, तुझे आभार मानतो''

**शिष्य :** लोकांना 'जेवण' वाढा.

**लोक :** जेवण्याचा अभिनय करुन म्हणा, ''बघा, बघा! प्रत्येकाला भरपूर जेवण आहे!''

''जेवण अगदी रुचकर होते!''

''बरेचसे जेवण शिल्लक राहिले!''

''बारा टोपल्या भरुन जेवण शिल्लक राहिले!''

''हा मोठाच अद्‌भुत चमत्कार म्हणायचा!''

**निवेदक किंवा मोठे मूल :** मदत करणाृया सर्वांचे आभार माना.

**प्रश्न :** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांनी वरील प्रश्न मोठया माणसांना विचारवेत. विचारा.

- 
- (मुलांनी व मोठया माणसांनी उदाहरणे सांगावीत).
- आमचे पाळक मेंढपाळ आज देवाच्या लोकांना कशा प्रकारे जेवण देतात?

*(उत्तर : देवाच्या वचनातून येशूने म्हटले, ''मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वराच्या मुखातून निघणाृया प्रत्येक वचनाने जगेल.'' (मत्तय 4:4). सैतानाने येशूला पाप करण्यचा मोह घातला तेव्हा येशूने प्रत्येकवेळी त्याला उत्तर देण्यासाठी देवाच्या वचनाचा उपयोग केला, हे स्पष्ट करुन सांगा).*

माशाचे एक साधे चित्र काढा. मुलांना ते उतरवून घेण्यास सांगा. मोठया मुलांना पाच भाकरी व दोन माशांचे चित्र काढावे असे वाटेल.



- मुले हे चित्र पुढच्या उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवतील तसेच घरी आईवडीलांना दाखवतील.
- येशूने लोकांच्या गरजा कशा प्रकारे पुरवल्या हे या चित्रावरुन स्पष्ट होते असे मुलांनी मोठया माणसांना आणि घरी पालकांना समजावून सांगावे.
- स्वर्गात आपल्याला कधीही भूक लागणार नाही, हे ही त्यांनी स्पष्ट करावे.

**पाठ करा योहान 6:51**

**कविता :** तीन मुलांनी स्तोत्र 146 मधून 2 व 6,7 व 8 आणि 9 व 10 ही वचने प्रत्येकी दोन याप्रमाणे म्हणावीत. लोक देवाच्या वचनातून कशा प्रकारे मेजवानीचा आनंद लूटतात या विषयावर मोठया मुलांना कविता किंवा गीते लिहिण्यास सांगा. त्यांना हे काम आठवडयात करता येईल.



**प्रार्थना.** मत्तय 6:9-13 मधून प्रभूची प्रार्थना म्हणा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net